# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील जीवनप्रेरणा

**डॉ. शरद जे. मेश्राम**
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया
९४०४२७९७९९
sweetsharad123@gmail.com

**प्रस्तावना :—**

साधारणपणे १९६० हे वर्ष दलित साहित्याचे उगम वर्ष मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि त्या काळापासून सुशिक्षित झालेल्या दलित वर्गातील लोकांनी लेखन करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या काळात फार मोठ्या प्रमाणात दलितांची आत्मचरित्रे आणि त्यांच्या कविता लिहिल्या गेल्याचे दिसते. दलित कवींमध्ये पुरुषांची संख्या ही अधिक दिसून येते, त्या तुलनेत स्त्री कवयित्रींची संख्या काहीशी कमी आहे. आंबेडकरवादी कवितांचा विचार करताना तत्कालीन समाज वास्तव अतिशय तीव्रतेने बदलणारे समाजजीवन, शिक्षणाचा सातत्याने वाढणारा प्रचार, सातत्याने बदलणारी आर्थिक परिस्थिती, झपाट्याने बदलणारे राजकारण, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती या समाजामध्ये असलेले स्त्रियांचे स्थान आणि दलित स्त्री असल्यामुळे त्यांना त्यांना जाणवणारे अनुभव, एक स्त्री म्हणून त्यांच्या जीवनात येणाऱ्या मर्यादा, विविध प्रकारची सामाजिक बंधने या सर्वांमुळे निर्माण होणारे दु:ख, त्या सर्वांचेच प्रतिबिंब आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेमध्ये पडले असल्याचे दिसते. साधारणपणे १९७० च्या सुमारास आंबेडकरवादी कवयित्रींची कविता ही अधिक जोमाने पुढे आली. कविता या साहित्यप्रकाराकडे पाहण्याची या महिलांची दृष्टी, त्या समाजात घडणाऱ्या विविध घटना प्रसंग अशा अनेक घटकांचा विचार आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा शोधतांना करावा लागतो.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा :—**

भारतीय पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान दिले आहे. संपूर्ण समाजाचा विचार करताना स्त्री या घटकाला दुर्लक्षित केले जाते. त्यांचा समावेश कोणत्याही क्षेत्रात केला जात नाही. स्त्रियांना एका अर्थाने गृहित धरले जाते. प्राचीन काळामध्ये आपल्या समाजात जी चातुर्वर्ण्य पद्धती होती त्यामध्ये स्त्री ही उच्चवर्णीय असो की निम्न वर्णीय तिला कोणत्याही प्रकारचे महत्त्व नव्हते. जुन्या काळात स्त्रियांवर फार मोठ्या प्रमाणात अन्याय केला जायचा. तिच्यावर अनेक बंधने घातली जायची. कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य तिला उपभोगता येत नव्हते. बौद्धिक, वैचारिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध पातळ्यांवर स्त्रियांची कुचंबणा होत असे. सध्याच्या आधुनिक काळामध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढू लागल्याने त्या विचारशील झाल्या आणि प्राचीन काळापासून स्त्रियांवर होत असलेला अन्याय, अत्याचार त्यांनी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजच्या काळात स्त्रीवाद असाही त्याचा एक वेगळा प्रवाह निर्माण झाला आहे, ज्यातून स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य संपूर्ण जगभर सुरू झाले आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. स्त्री ही सुद्धा पुरुषाइतकाच समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे ही जाणीव हळूहळू समाजात पसरू लागलेली आहे. आजच्या आधुनिक काळात स्त्री संरक्षणाविषयी अनेक प्रकारचे कायदे लागू करण्यात आलेले आहेत. आंबेडकरवादी कवितेमागील प्रेरणा शोधतांना या संपूर्ण

गोष्टींचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा, महात्मा फुले यांचे विचार, त्यांनी संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी निर्माण केलेली चळवळ, शिक्षण विषयक त्यांचे विचार इत्यादी काही प्रेरणा आंबेडकरवादी कवितेच्या मागे असलेल्या आपल्याला दिसतात.

हिरा बनसोडे यांनी अनेक वर्षांपासून कविता लेखन केले आहे. आपल्या कविता लेखनामागची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत हे त्यांनी आपल्या 'फिर्याद' या कवितासंग्रहाच्या मनोगतामध्ये व्यक्त केलेले आहे. त्या म्हणतात, ''मी कार्यकर्ती नाही, कुठल्याही चळवळीशी माझा संबंध नाही, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी माझे अतूट नाते आहे. या चळवळीने मला घडविले. बाबासाहेबांनी दिलेल्या उजेडाच्या फुलांचे दिवे करून मी प्रगतीचा मार्ग शोधत आहे. 'आघात' (१९९२) या आपल्या कवितासंग्रहात कवयित्री संध्या रंगारी आपली प्रेरणा स्पष्ट करतात, ''क्रांतिवीर ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन ज्ञानाची पंख फुटली आणि नवचैतन्य घेऊन दुखित शोषितांच्या विश्वात भराऱ्या मारू लागली.'' आदिवासी समाजातील कवयित्री उषाकिरण आत्राम यांनीसुद्धा फुले—आंबेडकर यांचा परिवर्तनवादी विचार हाच आपल्या काव्य लेखनामागील प्रेरणा असल्याचे नमूद केले आहे. 'म्होरकी' या आपल्या काव्यसंग्रहाच्या मनोगतात त्या म्हणतात, ''फुले—आंबेडकर साहित्याशी स्वतःचं नातं, त्या बंधुत्वाशी नाळाचं नात जुळवून माझी लेखणी मी चालवीत असते. माझा दु:खी कष्टी समाज आजही वेदनेने कन्हत आहे.'' 'लेखणीच्या तलवारी' या पुस्तकात उषाकिरण आत्राम यांनी म्हटले आहे, ''त्या झगमगत्या जगात माझ्यासारख्या आदिवासी कवयित्रींच्या कवितेचे रुपडं सौंदर्यवान नसेल पण जरूर ताकदवान आणि वास्तववादी आहे. हा नकली गलबला करणारा नाटकी चेहरा नाही तर अस्सल साग आणि अस्सल नाग आहे. बाबासाहेबांचे विचारधन वाटणारी ही सावित्रीची लेक वेदनेच्या हाका वाटीत एकीसाठी संघटित होण्यासाठी आपला दिवा आपण घेऊन प्रकाशमान गतिमान, बुद्धिमान, विचारवंत होण्यासाठी हाक देणारी लेखणीची तलवार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीचा विचार आणि या मानव मुक्तीसाठी त्यांनी दिलेला लढा याने तत्कालीन आणि त्यानंतरही पिढी घडवण्याचे काम केलेले आहे. उषाकिरण आत्राम बाबासाहेब आंबेडकरांचे हेच विचारधन आपल्या काव्य निर्मिती मागील प्रेरणा असल्याचे स्पष्ट करतात.

'वळणाची वाट' या काव्यसंग्रहात कुसुमताई गांगुर्डे लिहितात,

''पूर्वजन्माचे पाप
म्हणून हिन जात
सांगून या आम्हा
तुम्ही केली वाताहात
ज्ञान आले दारा
अज्ञानाला ग्रहण
दीप भिमाने लावला
पेटली काळोखाची सरण''

संत चोखामेळा यांनी आपली जाती हिन असून परमेश्वराची सेवा आपल्या कडून कशी होणार अशी भावना त्या काळानुरूप व्यक्त केली होती, परंतु कुसुमताई गांगुर्डे म्हणतात की, आपली जात हीन आहे म्हणून तुम्ही आमची वाताहात केली. आमच्या पूर्वजांनी पासून आमच्यावर अज्ञान तुम्ही लादले परंतु मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिक्षणाच्या प्रकाशामुळे तुमच्या या अज्ञानाी केव्हाच घसरण झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन शिक्षण घेऊन हे समाजभान कवयित्रीला प्राप्त झाले आहे.

महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचार मुळे जातिभेदाच्या दुष्टचक्रातून समाज पूर्णपणे बाहेर पडला या संपूर्ण प्रवासात दलितच नव्हे या संपूर्ण प्रवाहात दिल्लीतच नव्हे तर समाजव्यवस्थेने जगणेच नाकारलेल्या आदिवासी समूहाचा ही समावेश होतो म्हणूनच आदिवासी समाजातील कवयित्री ही या सर्वांचा प्रामाणिकपणे स्वीकार करतात उषाकिरण आत्राम आपल्या 'म्होरकी' या कवितेत वर्णन करतात.

''अंधारातील धूलिकणांचे
सुवर्ण तू केले
मुक्या आंधळ्या पंगुनाही
जीवन तू दिले
सागर धरती निल नभाहून
महान तव गाथा
सूर्य नगरीच्या हे भिमराया''

परंपरागत भारतीय समाजव्यवस्थेने नाकारलेल्या प्रत्येक समूहाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ व त्यांचे विचार हे आपले वाटावे असे आहेत कारण त्यांनी इतर सर्व गोष्टींपेक्षा माणूस याच घटकाला अधिक महत्त्व दिले आहे ही गोष्ट आपल्याला लक्षात घ्यावी लागते.

संध्या रंगारी आपल्या आघात या कवितेमध्ये म्हणतात,

''बाबांचा ध्वज
माझ्या खांद्यावर हाय
त्याचा संदेश मला
घरोघरी पोचवायचा हाय
म्हणूनच
म्या तशी मरणार न्हाय
अन्यायावर आघात करणार हाय
आर! मला माणूस म्हणून जगायचं हाय''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आणि चळवळीचे बळ जगण्याला मिळाल्याने आंबेडकरवादी कवयित्री स्वताकडे माणूस म्हणून पाहू लागले सम्यक विचारांचा स्वीकार केल्यामुळे भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण या स्त्रिया निकोप दृष्टीने करू लागल्या भूतकाळातील लाजिरवाण्या जगण्याचे संदर्भ या

कवयित्रींच्या अनेक कवितांमध्ये आलेले दिसतात मात्र आक्रमक ऐवजी त्यांचे विचारी आणि मन प्रकट झाले आहे त्यामुळेच त्यांच्या भूतकाळातील दु:खाची जाणीव वर्तमान काळातील जगण्याचा संघर्ष आणि भविष्यकाळातील आशावादी आणि सकारात्मक जीवन भान असा त्यांचा काव्य प्रवास या आंबेडकरवादी कवयित्रींची कविता करताना दिसते या काव्य लेखनाची प्रेरणाच मानव मुक्तीचा विचार असल्याने हा विचार अपरिहार्यपणे कवितेत प्रकटने स्वाभाविक आहे

आपल्या दगड या कवितेत उषा हिंगोणेकर म्हणतात

माझ्या जगण्याच्या
अधिकारावर
अजूनही नाही
माझा मालकी हक्क
या हक्कासाठी
मी उभारते लढा
तेव्हा माझ्या दिशेने
भिरकावले जातात दगड
ही व्यवस्था जगू देत नाही
मान सन्मानाने मला

या भारतीय समाजात स्त्रीच्या जगण्यावर तिचा स्वत:चा अधिकार नाही ही वस्तुस्थिती कवयित्री उषा हिंगोणेकर यांनी चित्रित केली आहे एखाद्या बाईने आपल्या या हक्कासाठी लढा द्यायची ठरविल्यास तिच्या जगण्याच्या या हेतू वरच आणि तिच्या चारित्र्यावरच संशय घेतला जातो एकूणच भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीला सन्मानाने जगता येत नाही हे वास्तव प्रस्तुत कवितेतून आपल्याला दिसते साधारणपणे १९७० च्या दशकात दलित कवयित्री कविता लिहू लागलेल्या आहेत असे दिसून येते सुरुवातीच्या काळातील नेत्यांची हे लेखन कवींच्या कवितांच्या अनुकरणातून काही प्रमाणात आले होते याशिवाय काही समकालीन कवींचा ही प्रभाव या कवयित्रींच्या कवितेवर होता हे मान्य करावे लागते परंतु त्यानंतर बदलत गेलेल्या सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक राजकीय आणि आर्थिक पर्यावरण यानुसार दलित कवित्री ची कविता आमुलाग्र बदललेली आहे असे दिसून येते दलित समाजामध्ये जन्मले जन्मल्याचा दली तत्त्वा च्या दु:खा बरोबर स्त्री म्हणून स्त्रीच्या वाट्यला येणारी वेदना या दलित कवी कवींनी आपल्या कवितांमधून मांडल्या असल्याचे दिसते भारतीय समाजात परंपरा रूढी रिवाज यासारख्या जुनाट रुसलेल्या अशा घटकांमध्ये स्त्रियांना बंदिस्त केले गेले आहे एक प्रकारे त्यांचे माणूस असणे असणेच पुरुषप्रधान संस्कृतीने नाकारले होते आंबेडकर वादी कवयीत्रीच्या कविता मध्ये समकालीन वास्तवाचे चित्रण केलेले दिसते

दलितसाहित्य प्रवाहातील साहित्याच्या संदर्भात केवळ वाळवंट कलाकृती एवढ्य मर्यादित अर्थ घेता येत नाही दलित साहित्यामध्ये सामूहिक मनाचा आविष्कार आहे हे लक्षात घेऊनच दलित साहित्याचा अर्थ आपल्याला लावावा लागतो महात्मा फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचार हे दलित साहित्याची प्रमुख निर्मिती केंद्र आहे दलित कवी तुमच्या कवितेची या संदर्भातही हाच क्रांतिकारी विचार असल्याचे आपल्याला दिसते या सर्व कवयित्रींच्या प्रेरणा मध्ये काही समानता सुद्धा आपल्याला दिसून येते

त्यात फुले—आंबेडकरांचा मानव मुक्तीचा विचार हा होय भारताच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व आणि त्यांची चळवळ दलित समाजासाठी दिशा दर्शक ठरलेला आहे १४ ऑक्टोबर १९५६ चाली बाबासाहेबांनी केलेले धर्मांतर आणि अनेक सभांमधून तसेच त्यांच्या वृत्तपत्रातील लेखांमधून त्यांनी समाजाला दिलेले मौलिक योगदान यामुळे दलित समाजामध्ये आत्मभान निर्माण झाले आणि बाबासाहेबांच्या प्रेरणेने सुशिक्षित झालेली पिढी स्वत:चे दलितत्व नाकारून नव्या जीवनासाठी आपल्या हक्कांसाठी संघर्ष करू लागली याचे चित्रण तत्कालीन दलित साहित्यामध्ये आपल्याला दिसते.

**संदर्भ ग्रंथ**

१. फिर्यादि, हिरा बनसोडे, समाज प्रबोधन संस्था, पुणे १९८४
२. आघात, संध्या रंगारी, शब्दालय प्रकाशन, नांदेड १९९२
३. साक्ष, सुरेखा भगत, प्रशांत प्रकाशन, बुलढाणा, १९९४
४. म्होरकी, उषाकिरण आत्राम, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर १९९७
५. लेखणीच्या तलवारी, उषाकिरण आत्राम, प्रकाशक, उषाकिरण आत्राम, गोंडपिंपरी, २००९